**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशभरातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी आवश्यक असलेला निधी केंद्र सरकार देईल, असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं आश्वासन.**
2. **लोकशाही- न्याय- समता या विचारावर पक्षाची वैचारिक पायाभरणी या चिंतन शिबीरातून दृढ करणार- सुनिल तटकरे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे चिंतन शिबिर उद्या नागपुरात.**
3. **भारतीय ज्ञान भारतीय पद्धतीने देणे आवश्यक- डॉ.प्रशांत बोकारे, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा, वर्धापन दिन समारोह संपन्न.**
4. **मनपाच्या 'हेल्दी स्ट्रीट्स' धोरणाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, १,३०० हून अधिक नागरिकांनी सर्वेक्षणात घेतला भाग.**

**आय.टी.आय.**

सर्व राज्यांमधल्या, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अर्थात, आय.टी.आय.ना, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित, केंद्रांमध्ये, अद्ययावतीकरण करण्यासाठी, गरजेचा असलेला निधी, केंद्र सरकार देईल असं आश्वासन, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी दिलं. त्या आज नवी दिल्ली, भारतीय गुणवत्ता व्यवस्थापन फाउंडेशनच्या परिसंवादात, बोलत होत्या. उद्योग विश्वाच्या बदलत्या गरजांशी, जुळवून घेण्यासाठी, आय.टी.आय.चा कायापालट होत असल्याचं, त्या म्हणाल्या. गेल्या दोन ते तीन अर्थ संकल्पांमध्ये, नागरिकांच्या कौशल्य विकासासाठी, सरकारनं तरतुदी केल्याचंही, त्यांनी सांगितलं.

**सेवा सप्ताह**

सेवा आणि, सु-शासनाच्या मार्गावरून चालताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी, प्रयत्नशील आहे. सरकारच्या प्रयत्नांमुळे, कृषी क्षेत्रात सुधारणा होत असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात ही, वाढ होत आहे. अधिक माहिती, आमच्या प्रतिनिधीकडून...

***प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील कृषी क्षेत्राचं क्षितिज आणखी विस्तारत आहे. शेतीपूरक विविध उद्योगांच्या माध्यमातून ग्रामीण कुटुंबांना उत्पन्नाचे नवे स्रोत उपलब्ध होत असून त्यांचं भविष्य सुरक्षित होण्यासाठी हे कृषी आधारित उद्योग सहाय्यभूत ठरत आहेत. धान्य पिकांबरोबरच फळे, भाजीपाला, मसाले, दुध आणि दुग्धजन्य पदार्थ, मत्स्यउत्पादन, पशुपालन यासारख्या शेतीपूरक उद्योगांना केंद्र सरकारने दिलेलं पाठबळ शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.)***

**चित्र प्रदर्शन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील, नवा भारत आणि सामर्थ्यवान, समृद्ध भारतीय सांस्कृतिक परंपरा उलगडणाऱ्या, अनोख्या चित्र प्रदर्शनाचं उद्घाटन, सांस्कृतिक कार्यमंत्री, ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते, करण्यात आलं. या प्रदर्शनाच्या माध्यमातून, नव्या भारताच्या

वाटचाली बरोबरच देशातील पुरातन, सांस्कृतिक वैशिष्टे आणि परंपरांची नव्या पिढीला माहिती होईल असा विश्वास, मंत्री ॲड.शेलार यांनी व्यक्त केला.

**नमो नेत्र संजीवनी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसा निमित्त, कालपासून राज्यभर राबविण्यात येणाऱ्या, नमो नेत्र संजीवनी, आरोग्य अभियानाचा शुभारंभ, भंडारा जिल्ह्यात झाला. जिल्हा सामान्य रुग्णालयात झालेल्या उद्घाटन कार्यक्रमात मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या विशेष मोहिमेअंतर्गत, जिल्ह्यातील प्रत्येक तालुका आणि गाव पातळीवर, नेत्र तपासणी शिबिरे, घेण्यात येणार आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना मोफत, नेत्र तपासणी, औषधोपचार, शस्त्रक्रिया आणि चष्मेवाटपाचा थेट लाभ, मिळणार आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर मोफत चष्मे तसंच काचबिंदूसह इतर नेत्र विकारांवरील निदान आणि उपचारही या उपक्रमातून, केले जाणार आहेत.

**सुनिल तटकरे**

लोकशाही-न्याय-समता या विचारावर, पक्षाची वैचारिक पायाभरणी, या चिंतन शिबीरात दृढ केली जाणार असल्याची माहिती, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, खासदार, सुनिल तटकरे यांनी आज, नागपुरात, पत्रकार परिषदेत दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे महत्त्वाचे चिंतन शिबिर, उद्या सकाळी साडेनऊ वाजता, नागपूर इथं सुरु होणार आहे. या शिबिराला, राष्ट्रवादी काँग्रेसचे, राष्ट्रीय अध्यक्ष आणि उप-मुख्यमंत्री, अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष, खासदार, प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार, सुनिल तटकरे, ज्येष्ठ नेते आणि अन्न आणि नागरी पुरवठामंत्री, छगन भुजबळ आदींसह, पक्षाचे सर्वमंत्री, आजी-माजी आमदार, सर्व पदाधिकारी, जवळपास, ५०० पदाधिकारी सहभागी होणार आहेत. विदर्भातील आयोजन, महत्वाचं असल्याचं ते यावेळी म्हणाले -

***त्याच्यामुळे पक्षाचा विस्तार करणं हा एक भाग आहे. आमची आतापर्यंत चिंतन शिबिर कोकणात झालं, एक शिर्डीत झालं, एक पुण्यात झालं, पक्षाचं वर्धापन दिन आम्ही पुण्याला केला विदर्भात जावं विदर्भ हा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे त्यामुळे फडणवीस साहेबांचा बालेकिल्ला आहे ते मुख्यमंत्री आहेत, भाजपचाही आहे राष्ट्रवादीचे वाटचालसुद्धा महायुती म्हणून आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून स्वतंत्रपणाने होते आहे.***

हे चिंतन शिबिर म्हणजे, पक्षातील आत्मपरीक्षण आणि विचार मंथनाची एक प्रक्रिया आहे. हे केवळ अंतर्गत, पुनरावलोकन नाही तर, जनतेच्या अपेक्षा आणि आकांक्षा यांच्याशी आपली तत्वे जोडण्याचा, पुढे पाहणारा उपक्रम आहे. या शिबिरात, पक्षाची विचारसरणी, मूलभूत तत्वे आणि समकालीन आव्हाने या विषयावर, व्यापक चर्चा, पक्षाची दृष्टी जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी धोरण आखणी, संघटनात्मक बळकटीकरण आणि भविष्यासाठी राजकीय आणि सामाजिक तयारी यावर, विचार केला जाणार आहे असंही, सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केलं.

**जीएसटी सुधारणा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, स्वातंत्र्य दिनी, लाल किल्ल्यावरुन केलेल्या भाषणात, जी.एस.टी. सुधारणांची घोषणा केली. त्यानुसार जी.एस.टी. परिषदेनं, कर रचनेत, महत्वाचे बदल केले

आहेत. जी.एस.टी. सुधारणां अंतर्गत, सरकारनं, वस्त्रोद्योगा वरील करात, लक्षणीय घट केली असून, सामान्य माणसावरील, आर्थिक भार कमी झाला आहे. नवीन कर रचनेत, मानव निर्मित धाग्यांवरील जी.एस.टी. दर, १२ टक्क्यांवरून, ५ टक्के करण्यात आला आहे. या निर्णयामुळे, वस्त्रोद्योग क्षेत्रातला खर्च कमी होईल, ज्यामुळे मागणी वाढेल आणि निर्यात वाढेल अशी अपेक्षा आहे. तयार कपड्यांवरील जी.एस.टी. देखील, कमी करण्यात आला आहे. प्रति तुकडा, अडीच हजार रुपयां पर्यंतच्या कापडांसाठी, करदर आता, ५ टक्के करण्यात आला आहे, ज्यामुळे, टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये, मागणी वाढेल आणि, श्रम-केंद्रित, वस्त्रोद्योग युनिट्सना, प्रोत्साहन मिळेल.

**राहुल गांधी**

देशभरातल्या मतदान प्रक्रियेत, मोठ्या प्रमाणात, घोटाळा झाल्याचा आरोप, लोकसभेतले विरोधी पक्षनेते, राहुल गांधी यांनी आज पुन्हा, नवी दिल्लीत, वार्ताहर परिषद घेऊन केला. यासाठी त्यांनी, महाराष्ट्रातल्या, राजुरा आणि कर्नाटकातल्या आळंद विधानसभा मतदार संघातली उदाहरणं उपस्थितांच्या समोर मांडली. बनावट अर्ज, काही सॉफ्टवेअर वापरुन, मतदारांची नावं वगळणं, बोगस मतदार घुसवणं हे प्रकार, झाल्याचा दावा त्यांनी केला. राजुरा मतदारसंघात, सहा हजार ८५० मतचोरी झाल्या प्रकरणी, पोलिसांनी एफ.आय.आर.ही दाखल केल्याचा दावा, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष, हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. दरम्यान, राहुल गांधी यांनी केलेले सर्व आरोप हे निराधार असल्याचं, केंद्रीय निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. ऑनलाइन पद्धतीनं मतदारांना, वगळता येत नसल्याचं स्पष्टीकरण, आयोगानं दिलं आहे.

**संस्कृत विश्वविद्यालय**

कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्व विद्यालयाच्या, वर्धापन दिन समारोह, आज संपन्न झाला. विश्वविद्यालयाच्या स्थापनेला 28 वर्षे पूर्ण होवून, 29 व्या वर्षात, विश्वविद्यालयानं पदार्पण केलं आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान, कुलगुरू, डॉ.अतुल वैद्य यांनी भूषविलं. वर्धापन दिनाला, प्रमुख अतिथी या नात्यानं, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ.प्रशांत बोकारे उपस्थित होते. सर्व अधिष्ठाता आणि संवैधानिक अधिकारी, यांच्यासह, रामटेक परिसर संचालक, प्रोफेसर हरेकृष्ण अगस्ती आणि कुलसचिव डॉ.देवानंद शुक्ल यांची, व्यासपीठावर उपस्थिती होती. मुख्य अतिथी कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे यांनी, आपल्या विचारशील, अभ्यासपूर्ण आणि उत्स्फूर्त भाषणात, भारतीय ज्ञान, भारतीय पद्धतीनं दिलं पाहिजे यावर, भर दिला. “विश्वविद्यालयाच्या, 28 वर्षांच्या कालावधीत, नेत्रदीपक प्रगती केली असून, यासाठी मी, सर्वांचे अभिनंदन करतो. शिक्षणाचे, आंतर राष्ट्रीयकरण ही संकल्पना समजावून सांगताना, डॉ.बोकारे म्हणाले, भारतीय ज्ञान, भारतीय पद्धतीनं देणे म्हणजे, आपले शिक्षण, आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचवणे होय.

**हेल्दी स्ट्रीट्स**

नागपूर मनपा, आय.टी.डी.पी.इंडिया यांच्या तांत्रिक सहकार्यानं, नागपूर शहरातील रस्त्यांना, अधिक सुरक्षित, हिरवे आणि सर्वसमावेशक बनवण्यासाठी, शहराचे पहिलं, हेल्दी स्ट्रीट्स धोरण, तयार केलं जात आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक, डॉ.अभिजीत चौधरी आणि, नागपूर स्मार्ट सिटीच्या, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त, वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात, नागरिकांच्या सोयीकरिता, विविध उपाय योजना, राबविल्या

जात आहेत. याचाच एक भाग म्हणून, हेल्दी स्ट्रीट धोरण तयार केलं जात आहे. या धोरणामध्ये, पदपथ, सुरक्षित सायकलसाठी सुविधा, सुरक्षित चौक आणि चालणे, सायकलनं प्रवास करणे आणि, सार्वजनिक वाहतुकीला, प्राधान्य देणारे रस्ते, विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. याकरिता केल्या जात असलेल्या सर्वेक्षणाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. केवळ दोन आठवड्यांत, १,३०० हून अधिक, नागरिकांनी या सर्वेक्षणात भाग घेऊन, नागपूरच्या रस्त्यांच्या भविष्याबद्दल, आपली मतं नोंदवली आहेत.

**महिला आयोगाची जनसुनावणी**

नागपुरात आज, महिला आयोगाची, जनसुनावणी असून, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा, रुपाली चाकनकर यांच्या उपस्थितीत, जनसुनावणी झाली. एकूण चार पॅनेल तयार करण्यात आले होते. त्या माध्यमातून, जनसुनावणी घेण्यात आली. जन सुनावणीसाठी, मोठ्या प्रमाणात महिलांची उपस्थिती होती. नागपूरचे जिल्हाधिकारी, डॉ.विपीन इटनकर, जिल्हा ग्रामीण, पोलीस अधीक्षक, हर्ष पोद्दार तसंच, जिल्हा परिषद, नागपूरचे, मुख्य कार्यकारी अधिकारी, विनायक महामुनी उपस्थित होते. नागपूर विभागात, वेगवेगळ्या जिल्ह्यात, महिला आयोगाची जनसुनावणी होत असून, आज, नागपुरात जनसुनावणी घेण्यात आली.

**आशिया चषक**

आशिया चषक, क्रिकेट स्पर्धेत आज, ग्रूप-बी मध्ये, श्रीलंका आणि अफगाणिस्तान, यांच्यात सामना होणार आहे. सुपर फोरमध्ये, जागा मिळवण्यासाठी, अफगाणिस्तानच्या संघाला, हा सामना जिंकणं आवश्यक आहे. काल या स्पर्धेत, पाकिस्ताननं, संयुक्त अरब अमिरातीचा पराभव करुन, भारतासोबत, सुपर फोरमध्ये, स्थान मिळवलं आहे.

*****